# नवी मुंबई महानगरपालिका

**महानगरपालिका सचिव कार्यालय, ८ वा मजला, बेलापूर भवन सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-** **दिनांक ०९/०४/२०१३.**

नवी मुंबई महानगरपालिकेची **एप्रिल महिन्याची सर्वसाधारण मासिक सभा, बुधवार, दिनांक १७ एप्रिल, २०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता** नवी मुंबई महानगरपालिका, बेलापूर भवन, सी.बी.डी., बेलापूर येथील ७ व्या मजल्यावरील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

१. स्थायी समिती सदस्य पदाच्या रिकाम्या होणा-या ८ जागांवर नामनिर्देशनाद्धारे नियुक्ती करणे.

२. (अ) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील एक दलित वस्ती व निवडून आलेल्या सदस्यांपैकी एका महिला सदस्याची नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा जिल्हास्तरीय समितीवर नियुक्ती करणे बाबत, मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचे दिनांक १२ डिसेंबर २०१२ चे पत्र क्र. सामान्य/कक्ष.३/टे.२/वशी/नागरी द.व.पा.पु. यो./२०१२.

**(ब)** नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने एका सदस्याची हात वर करुन साध्या बहुमताने निवड करणे.

३. मनपाचा सन २०१२-२०१३ चा सुधारीत आणि सन २०१३-२०१४ चा अर्थसंकल्प "अ" आणि "क."

४. परिवहन उपक्रमाचा सन २०१२-२०१३ चा सुधारीत आणि सन २०१३-२०१४ चा अर्थसंकल्प "ब."

५. शिक्षण मंडळाचा सन २०१२-२०१३ चा सुधारीत आणि सन २०१३-२०१४ चा अर्थसंकल्प.

६. वृक्षप्राधिकरणाचा सन २०१२-२०१३ चा सुधारीत आणि सन २०१३-२०१४ चा अर्थसंकल्प.

७. इतिवृत्त कायम करणे.

**८. प्रश्नोत्तरे.**

**स्थायी समिती मधील ठराव :**

९. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात उपकरा ऐवजी स्थानिक संस्था कर दि. १ एप्रिल, २०१३ पासून बसविणे.

**परिवहन समिती मधील ठराव :**

१०. मा.औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयानुसार नमुंमपा परिवहन उपक्रमाच्या आस्थापनेवरील "कनिष्ठ लिपीक कम टंकलेखक" या संवर्गात अंतर्भुत केलेली "डाटा एन्ट्री ऑपरेटर" या संवर्गाची ०५ पदे नव्याने निर्माण करणे.

**आयुक्तांकडील प्रस्ताव :**

११. मे. रिलायन्स जिओ इन्फोकॉम लि.यांना 4G तंत्रज्ञानावर आधारित कम्युनिकेशनकरिता ग्राउंड बेस्ड मास्ट (Ground Based Mast) उभारण्यास परवानगी देणे.

१२. नमुंमपाच्या आस्थापनेवर निर्माण असलेले समाज विकास अधिकारी व आरोग्य पर्यवेक्षक हे दोन संवर्ग पदोन्नतीकरीता वळती करणे.

१३. नमुंमपाचे 'etc' अपंग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्रांतर्गत अपंग मुले व व्यक्तिकरिता विविध अपंग योजना राबविणे.

१४. नमुंमपा अंतर्गत सार्वजनिक रुग्णालय वाशी येथे महानगरपालिका व खाजगी संस्थेच्या भागीदारीने (PPP), CT SCAN सेंटर कार्यान्वित करणे.

१५. भुखंड क्र. १२ए, सेक्टर-१५, नेरुळ येथील मंडई विकासाच्या मंजूर प्रस्तावाचा फेरविचार करणे.

१६. नमुंमपाच्या आस्थापनेवर सफाई कामगार या पदावर लाड कमिटीच्या शिफारशी नुसार वारसा हक्क पध्दतीच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने विशेष बाब म्हणुन कायम स्वरुपातील नेमणुक करणे.

१७. नमुंमपाच्या विविध विभागांकरीता कार्यालयीन फर्निचर खरेदी करणे.

१८. नमुंमपासाठी प्रवासी परवाना असलेली वाहने भाडयाने पुरविणे.

१९. नमुंमपाच्या आस्थापनेवर सफाई कामगार या पदावर अनुकंपा तत्वावर /लाड कमिटीच्या शिफारशीनुसार नोकरी देणेकरिता सदर पदाकरिता सेवा भरती नियमातील शैक्षणिक अर्हता शिथिल करुन तसेच विशेष बाब म्हणुन कायम स्वरुपातील नेमणुक करणे.

२०. हॉटेल थ्री स्टार, खारघर येथील अनधिकृत बांधकाम प्रकरणी नगरसेवक श्री. संतोष शेट्टी, प्रभाग क्र. ७२ व नगरसेविक श्रीमती अनिता संतोष शेट्टी, प्रभाग क्र. ७४ यांना मु.प्रां. म. अधिनियम, १९४९ च्या कलम १० (१)(ड) च्या तरतुदी लागू होत असल्यामुळे सदर बाब मा. सर्वसाधारण सभेपुढे योग्य त्या निर्णयासाठी ठेवणे.

२१. नमुंमपा क्षेत्रामध्ये असलेल्या शाळांच्या इमारतींना विज अटकाव यंत्रणा (Lighting Arrester) उभारणे.

**२२. सौ. माधुरी ज. सुतार, यांजकडून :-**

नवी मुंबई शहराला कार पार्किंग ही एक गंभीर समस्या भेडसावत आहे. बहुतेकदा गाडया हया शाळेची मैदाने, फुटपाथ रहदारीचे रस्ते यावर पार्क केली जातात. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होवून ट्रॅफिक जॅम होत. शिरवणे प्रभागामध्ये असणा-या शाळेचे मैदान किंवा सेक्टर १ मधील गार्डन येथे अंडरग्राऊंड पार्किंग निर्माण करुन वाहन पार्किंगची समस्या सोडवावी " पे अन्ड पार्क" धोरण दाखवावे जेणे करुन महापालिकेच्या उत्पन्नात भर पडु शकते.

**२३. श्री. संतोष देवाप्पा शेट्टी, यांजकडून :-**

नेरुळ, सेक्टर ९ येथे सिडकोने बांधलेले समाजमंदिर तोडून मनपातर्फे बहुउद्देशिय इमारतीचे बांधकाम चालू असून जवळजवळ ९० टक्के बांधकाम पुर्ण झाले आहे. या इमारतीच्या मागे मोकळी जागा आहे या ठिकाणी आजूबाजूच्या सोसायटयांमधुन डेब्रिज टाकला जातो, सदरची मोकळी जागा इतर कोणत्याही कामासाठी उपयोगात येणार नाही. तरी ही मोकळी जागा बहुउद्देशिय इमारतीच्या वाहन पार्किंगसाठी वापरणे.

**२४ ते २६. सौ. कोमल सोमनाथ वास्कर, यांजकडून :-**

(२४) **प्र.** क्र.६३, सानपाडा, सेक्टर ५ मधील गावठाण विस्तारातील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली असुन वारंवार डागडुजी करुनही काही उपयोग होत नाही. तरी सदर रस्त्याचे डांबरीकरण करणे. (२५) **प्र.** क्र.६३, सानपाडा गावातील नमुंमपा शाळा क्र. १८ व १९ च्या सद्यस्थित असलेल्या वर्गखोल्या नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेमुळे अपुरी पडत असल्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. तरी सदर ठिकाणी तिस-या मजल्याचे वाढीव बांधकाम करणे. (२६) **प्र.** क्र.६३, सानपाडा, सेक्टर ५ मधील गावठाण विस्तारातील सर्व पदपथांची दयनीय अवस्था झाल्यामुळे तरी सानपाडा गावातील व गावठाण विस्तारातील सर्व पदपथांची दुरुस्ती करणे.

**२७ ते २९. श्री. बाळकृष्ण चाहू पाटील, यांजकडून :-**

(२७) **प्र.** क्र. २० अंर्तगत नोसिल नाका येथे जेष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र बांधणे. (२८) **प्र.** क्र. २० अंर्तगत तळवळी गांव येथे समाज मंदिर बांधणे. (२९) **प्र.** क्र. २० अंर्तगत रबाळे गोठिवली नोसिल नाका, तळवली गावाअंतर्गत मंगल कार्यालय बांधणे.

**३० व ३१. श्री. संजय बाळाजी पाटील, यांजकडून :-**

(३०) **प्र.** क्र. २५, घणसोली, सेक्टर ६ च्या मागील बाजु सेक्टर ५ कडे जाण्यासाठी नागरिकांना सोयीसाठी नाल्यावर पादचारी पूल बांधणे. (३१) **प्र.** क्र. २५, घणसोली, येथील सावली तलावाचे सुशोभिकरण करणे.

**३२ व ३३. सौ. वंदना दिपक सोनावणे, यांजकडून :-**

(३२) प्र. क्र.६२, मधील डी ब्लॉक औद्योगिक परिसरामध्ये लहान व मोठे रस्त्यावर असलेल्या जुन्या स्ट्रीट लाईट फार जुन्या असुन त्या रात्रीच्या वेळी पुर्णपणे बंद असल्याकारणाने त्या सर्व जुन्या स्ट्रीट लाईट काढुन त्या ठिकाणी नवीन स्ट्रीट लाईट बसविणे. (३३) प्र. क्र. ६२, मधील डी ब्लॉक औद्योगिक परिसरातील उद्योगाकडुन मलनि:सारण व मालमत्ता कर व इतर प्रकारचे कर वसुल केला जातो तसेच या परिसरात कसल्याच प्रकारचे मलनि:सारण वाहिणी नाही त्या करिता या परिसरामध्ये मलनि:सारण वाहिण्या टाकणे.

**३४ ते ३६. श्री. काशिनाथ जनार्दन पाटील, यांजकडून :-**

(३४) **नमुंमपा**मध्ये काम करणा-या ज्या कर्मचा-यांचे वय ५० वर्षाच्या वर आहे अशा कर्मचा-यांना रक्तगट चेक करुन (तपासुन) त्या नमुन्या नुसार त्याचे वय ठरविणे.(३५) नमुंमपा हद्दीतील सिडको वसाहतीमध्ये ज्या प्रमाणे मलनि:सारण वाहिन्या व पेवर ब्लॉकची कामे केली जातात तशाच प्रकारे गावठाण विस्तार योजनेतील सोसायटयांमध्ये कामे करणे. (३६) नमुंमपा क्षेत्रामध्ये ठिकठिकाणी आगीवर नियंत्रण आणण्यासाठी फायर हैड्रन्ट (Fire Hydrant) बसविणे.

**३७ व ३८. श्री. अनंत लक्ष्मण सुतार, यांजकडून :-**

**(३७) प्र. क्र. ८ ऐरोली नाका येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी विरगुळा केंद्र बांधणे. (३८) प्र. क्र. ८ ऐरोली येथे पोलिस चौकी (बीट) बांधणे.**

**३९ ते ४१. सौ. सुरेखा रविंद्र इथापे, यांजकडून :-**

**(३९) प्र. क्र. ८०, नेरुळ से. १९अे येथील नवदुर्गा सोसायटी ते सफळ सोसायटी पर्यतच्या गटाराची दुरुस्ती करणे. (४०) प्र. क्र. ८०, नेरुळ से. १९अे, वंडर्स पार्क लगतच्या (नाल्यालगतच्या) वाकर्स वे ची दुरुस्ती करणे. (४१) प्र. क्र. ८०, नेरुळ से. १९अे, रायन इंटरनॉशनल स्कूल ते जवाहर नगर सोसायटी पर्यतच्या रस्तयाची सुधारणा करणे.**

**४२. श्री. बहादुर त्रिलोकसिंह बिष्ट, यांजकडून :-**

प्र. क्र. ०५, कन्हैयानगर येथील दुर्गामंदिर मागील रिक्त जागा व मंदिराच्या उजव्या बाजूस असलेल्या रिक्त जागेवर कन्हैयानगर मधील लहान व मोठया मुलांकरिता मैदान व जेष्ठ नागरीकांकरिता नाना नानी पार्क उद्यान बनविणे.

**४३ व ४४. श्री. सुरज बाळाराम पाटील, यांजकडून :-**

(४३) प्र. क्र. ७६ मध्ये नागरिकांच्या मागणीनुसार करावे ते कल्याण एन. एम. एम. टी ची बससेवा सुरु करणे. (४४) प्र. क्र. ७६ मध्ये भु. क्र. आर-३ ते विघ्नहर कॉम्प्लेक्स से. १४ येथे रस्त्यालगत गटर व फुटपाथ बनविणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**
**सही/-**
**(चित्रा बाविस्कर )**
**महानगरपालिका सचिव (प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक ०९ एप्रिल २०१३.**

# <u>नवी मुंबई महानगरपालिका</u>
## <u>शुध्दीपत्रक</u>

नवी मुंबई महानगरपालिकेची **एप्रिल महिन्याची सर्वसाधारण मासिक सभेची नोटीस दिनांक ०९/०४/२०१३ रोजी दै.सकाळ व दै.लोकमत या वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात आली होती.**

**सदर नोटीशीतील अनु.क्र. २ (अ) व ७ तसेच ठरवांच्या सुचनेतील ठराव क्र.२२ व ठराव क्र. ३५ मधील मजकूर चुकीचा प्रसिध्द झाला असून तो पुढीलप्रमाणे वाचण्यात यावा.**

**(अनु. क्र. २ (अ))** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील एक दलित वस्ती व निवडून आलेल्या सदस्यांपैकी एका महिला सदस्याची नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा जिल्हास्तरीय समितीवर नियुक्ती करणे.

**(अनु. क्र. ७) इतिवृत्त कायम करणे.**

(२२) नवी मुंबई शहराला "कार पार्किंग" ही एक गंभीर समस्या भेडसावत आहे. भविष्यात ही समस्या आणखी वाढवण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यातच शिरवणेसारख्या गाव-गांवठाण विभागामध्ये सिडको व मनपाच्या नियोजनाच्या अभावी रस्ते, गटर व फुटपाथ सुनियोजित नाहीत. घरे दाटीवाटीने बांधली गेल्यामुळे घरापर्यंत गाडया पोहचू शकत नाहीत. बहुतेकदा गाडया हया शाळेची मैदाने, फुटपाथ रहदारीचे रस्ते यांवर पार्क केली जातात. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होवून ट्रॅफिक जॅम होते. नागरिकांना हा त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे गावामध्ये असणारी मैदाने किंवा गार्डन यामध्ये आवश्यतेनुसार अंडरग्राऊंड पार्किंग उभारुन समस्या सुटु शकते. तरी प्रस्तावाला अनुषंगुन अशी विनंती आहे शिरवणे प्रभागामध्ये असणा-या शाळेचे मैदान किंवा सेक्टर -१ मधील गार्डन येथे अंडरग्राऊंड पार्किंग निर्माण करुन वाहन पार्किंगची समस्या सोडवावी व " पे अन्ड पार्क" धोरण दाखवावे जेणे करुन महापालिकेच्या उत्पन्नात भर पडु शकते.

**(३५) नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील सिडको वसाहतींमध्ये ज्या प्रमाणे मलनि:स्सारण वाहिन्या व पेवर ब्लॉक ची कामे केली जातात तशाच प्रकारे गावठाण विस्तार योजनेतील सोसायटयांमध्ये कामे करण्यात यावीत.**

**सदर सर्वसाधारण सभेच्या नोटीशीमधील इतर मजकूर जसाच्या तसा वाचण्यात यावा.**

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**
**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव (प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक ०९ एप्रिल २०१३.**